क्र. १६३ पहिले वर्ष

१७ सप्टेंबर २०२३

# रविवारची उपासना

## सामान्यकाळातील चोविसावा रविवार

### प्रस्तावना

आजच्या काळात समाजात सर्वत्र अंदाधुंदी, गोंधळ निर्माण झाला आहे. लोकांमध्ये दिशाहीन भटकंती सुरू आहे. अशावेळी ख्रिस्त आपल्याला सांगत आहे की, जे आत्म्याने दीन ते धन्य, कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. माणूस नितीमत्तेचा भुकेला, मनाने दयाळू अंतःकरणाने शुद्ध असावा. जगात शांतीचे राज्य स्थापन करण्यासाठी त्याची धडपड असावी. अशा ह्या नितीमत्तेकरिता त्याचा छळ झाला तरी तो धन्य आहे. दीन, गरीब, दुबळे ह्यांना दया दाखवून साह्य करण्यास ईश्वरी राज्याची मौलिक तत्त्वे आपण आपल्या जीवनात अंगीकारावीत म्हणून आजच्या मिस्साबलीत प्रार्थना करूया.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या**

हे सर्वसमर्थ परमेश्वरा, आमच्या निर्मात्या व मार्गदर्शका, आम्हांला तुझी मनापासून भक्ती करू दे व आमच्या जीवनातून तुझ्या क्षमेचे दर्शन घडू दे. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**बेनसिराक या पुस्तकातून घेतलेले वाचन २७:२०-२८:७**

**''तुझ्या शेजा-याने केलेल्या चुकीची क्षमा कर म्हणजे नंतर जेव्हा तू प्रार्थना करतोस तेव्हा तुझ्या पापांची क्षमा केली जाईल.''**

राग आणि क्रोध या वाईट आहेत आणि त्या पापी माणसाच्या अंगी असतात. जो सूड घेतो त्याचा प्रभू सूड घेईल. कारण तो त्याच्या पापांचा काटेकोर हिशोब ठेवतो. तुझ्या शेजाऱ्याने केलेल्या चुकीची क्षमा कर म्हणजे नंतर जेव्हा तू प्रार्थना करतोस जेव्हा तुझ्या पापांची क्षमा केली जाईल. जो माणूस दुसऱ्याविरुध्द राग बाळगतो, त्याने कोणत्या शब्दात प्रभूकडून दयेची अपेक्षा करावी ? आपल्यासारख्याच माणसाला दया दाखवली नाही तर स्वतःच्या पापांसाठी तो कशी काय प्रार्थना करु शकतो ? जड देही असून तो द्वेष करतो तर त्यांच्या पापांची क्षमा कोण करू शकेल? तुझ्या जीवनाचा अंत आठव, वैर थांबव, विनाशाची आणि मरणाची आठवण कर व प्रामाणिकपणे आज्ञा पाळ. देवाची आज्ञा लक्षात ठेव आणि तुझ्या शेजा-याचे वाईट चिंतू नकोस, परात्पराचा करार जाणून घे आणि त्यांच्या अपराध्यांकडे दुर्लक्ष कर

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**१०२:१-२, ३-४,९-१०,११-१२**

**प्रतिसाद : परमेश्वर दयाळू आणि कृपाळू आहे.**

१. हे माझ्या सर्व मना, परमेश्वराला धन्यवाद दे.
हे सर्व अंतर्यामा, त्याच्या पवित्र नामाला धन्यवाद दे. हे माझ्या मना, परमेश्वराला धन्यवाद दे, त्याचे सर्व उपकार विसरू नकोस.

२. तो तुझ्या सर्व दुष्कर्माची क्षमा करतो, तो तुझे सर्व रोग बरे करतो, तो तुझा जीव विनाशगर्तेतून उध्दारतो, तो तुला दया आणि करुणा ह्यांचा मुकुट घालतो.

३. तो सर्वदाच दोष देत राहणार नाही, जो आपला क्रोध सर्वकाळ राहू देणार नाही. आमच्या अपराधांच्या मानाने त्याने आम्हांला शासन केले नाही. त्याने आमच्या दुष्कृत्यांच्या मानाने आम्हांला प्रतिफळ दिले नाही.

४. कारण जसे पृथ्वीच्यावर आकाश उंच आहे, तशी त्याची दया त्याचे भय धरणाऱ्यांवर विपुल प्रमाणात आहे. पश्चिमेपासून पूर्व जितकी दूर आहे तितके त्याने आमचे अपराध आमच्यापासून दूर केले आहेत.

### दुसरे वाचन

**पौलाचे रोमकरांस पहिले पत्र यातून घेतलेले वाचन १४:७-९**

**''आपण जगलो किंवा मेलो तरी आपण प्रभूचेच आहोत.''**

आपल्यातील कोणी स्वतःकरिता जगत नाही आणि कोणी स्वतःकरिता मरत नाही, कारण जर आपण जगतो तर प्रभूकरिता जगतो आणि जर आपण मरतो तर प्रभूकरिता मरतो, म्हणून आपण जगलो किंवा मेलो तरी आपण प्रभूचेच आहोत. म्हणून कारण ख्रिस्त अशासाठी मरण पावला आणि पुन्हा जिवंत झाला की, त्याने मेलेल्यांचा आणि जिवंताचाही प्रभू असावे.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**योहान १०:२७**

**आलेलुया, आलेलुया!**

प्रभू म्हणतो, माझी मेंढरे माझी वाणी ऐकतात, मी त्यांना ओळखतो आणि ती माझ्यामागे येतात.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन १८:२१-३५**

**''सात वेळा क्षमा कर असे मी तुला म्हणत नाही, तर साताच्या सत्तर वेळा.''**

पेत्र येशूकडे येऊन म्हणाला, ''प्रभो माझ्या भावाने किती वेळा माझा अपराध केला असता मी त्याला क्षमा करावी? सात वेळा काय?'' येशू त्याला म्हणाला, सात वेळा असे मी तुला म्हणत नाही, तर साताच्या सत्तर वेळा.

म्हणूनच स्वर्गाचे राज्य कोणाएका राजासारखे आहे. त्या राजाला आपल्या दासांपासून हिशोब घ्यावा असे वाटले आणि तो हिशोब घेऊ लागला तेव्हा लक्षावधी रुपयांच्या कर्जदाराला त्याच्याकडे आणले. त्याच्याजवळ फेड करावयास काही नसल्यामुळे धन्याने हुकूम केला की, तो, त्याची बायको आणि मुले आणि जे काही असेल ते विकून फेड करून घ्यावी. तेव्हा त्या दासाने त्याच्या पाया पडून विनवले. मला वागवून घ्या, म्हणजे मी आपली सर्व फेड करीन तेव्हा त्या दासाच्या धन्याला दया येऊन

त्याने त्याला मोकळे केले आणि त्याचे कर्ज सोडले. तोच दास बाहेर गेल्यावर त्याला आपल्या सोबतीचा एक दास भेटला, त्याच्याकडे त्याचे शंभर रुपये येणे होते. तेव्हा तो त्याला धरुन त्याची नरडी आवळून म्हणाला, ''तुझ्याकडे माझे येणे आहे ते देऊन टाक.'' ह्यावरून त्याच्या सोबतीचा दास त्याच्या पाया पडून गयावया करून म्हणाला, ''मला वागवून घे, म्हणजे मी तुझी फेड करीन.'' पण त्याचे न ऐकता तो गेला आणि तो ते देणे फेडीपर्यंत त्याने त्याला तुरुंगात टाकले. तेव्हा घडलेला हा प्रकार पाहून त्याचे सोबतीचे दास अतिशय दु:खी झाले आणि त्यांनी येऊन सर्व काही आपल्या धन्याला स्पष्ट सांगितले. तेव्हा त्याच्या धन्याने त्याला बोलावून म्हटले, ''अरे दुष्ट दासा, तू गयावया केल्यामुळे मी ते सर्व देणे तुला सोडले होते. मी जशी तुझ्यावर दया केली तशी तुही आपल्या सोबतीच्या दासावर दया करावयाची नव्हतीस काय?'' मग त्याच्या धन्याने त्याच्यावर रागावून तो सर्व देणे फेडीपर्यंत त्याला हालहाल करणाऱ्यांच्या हाती दिले. म्हणून ''जा, तुम्ही प्रत्येकजण आपआपल्या बंधूला मनापासून क्षमा करणार नाही तर माझा स्वर्गातील पिताही त्याप्रमाणेच तुमचे करील.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रस्ताविक**

बंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

आपला प्रतिसाद असेल – **हे परमेश्वरा, दया कर, आणि आमची प्रार्थना ऐक.**

१. हरवलेल्या मेंढरांना शोधण्याचे कार्य करणाऱ्या ख्रिस्तसभेच्या सर्व सभासदांना परमेश्वराचे कृपासामर्थ्य लाभावे, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.

२. जात सर्वत्र अंधाधुंदी, भ्रष्टाचार पसरला आहे तो नाहीसा व्हावा व सर्वत्र शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.

३. आपल्या धर्मप्रांतातील प्रत्येक कुटुंबामध्ये प्रेमाचे आणि जीवाभावाचे वातावरण निर्माण व्हावे म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

४. जे लोक ख्रिस्तापासून दूर आहेत, त्यांना ख्रिस्ताकडे परत येण्याचा मार्ग सापडावा म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

५. आपल्या कौटुंबिक व वैयक्तिक हेतूंसाठी आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

## समारोप

हे स्वर्गीय पित्या, तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रध्देमधील उणीवा तुझ्या प्रेमाने भरून काढ. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, तुझ्या प्रजाजनांच्या प्रार्थना ऐकून घे व आमच्या दानांचा स्वीकार कर. आमच्या उपासनेमुळे आम्हांला मुक्तीचे वरदान दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, तू दिलेल्या ख्रिस्तप्रसादामुळे आमच्या विचारांत व कृतीत बदल घडून येवो. तुझ्या मार्गाने जाण्यास पवित्र आत्मा आम्हांला मार्गदर्शन व साहाय्य करो. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावात करतो.

## चिंतन

माणसाला राग येणे किती धोकादायक असते ते इंग्रजीमधील anger आणि danger ह्या दोन शब्दांच्या अक्षरांवरून दिसून येईल. फरक आहे फक्त d ह्या एकाच अक्षराचा. राग येणे हे स्वाभाविक आहे परंतु ते कसा हाताळायचा आणि कसा व्यक्त करायचा ह्याची कला आत्मसात करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**अ) आजचे पहिले वाचन (सिराक २७:३०, २८:७)** रागीट स्वभाव आणि प्रार्थनामय जीवनपध्दती यातील विसंगती दाखवून देते. सूड उगवू इच्छिणारा माणूस परमेश्वराकडून क्षमेची अपेक्षा करू शकत नाही.

**ब) आजचे दुसरे वाचन (रोम.१४:७–९)** स्वार्थत्यागी जीवन जगण्यास पाचारण करतो. रागीट मनुष्य कमालीचा आत्मकेंद्रित आणि स्वार्थी असतो. दुसऱ्यांविषयीच्या रागावर मात मिळवायची तर त्याच्या हिताचा विचार करून नि:स्वार्थी जीवन जगायला हवे.

**क) शु**भवर्तमानातील (मत्तय १८:२१–३५) दास हा स्वत: ऋणको होता. त्याचे मोठे देणे माफ झाल्यानंतर त्याने आपल्या सोबतीच्या क्षुल्लक देण्याकडे दुर्लक्ष करायला हवे होते. परंतु तो स्वार्थाने व रागाने आंधळा झाला होता. त्यातच त्याचा सर्वनाश झाला. राग हा वैयक्तिक अथवा प्रेषितीय कारणासाठी येत असतो. आपला राग प्रेषितीय स्वरूपाचा आहे हे समजून घेण्यासाठी बिशप फुल्टन शीन ह्यांनी तीन निकष दिलेले आहेत : १) आपल्याला उदात्त हेतूसाठी राग आलेला आहे का? २) हा राग आपल्या नियंत्रणाखाली आहे का? ३) हा राग योग्य प्रकारे (कुठलेही नुकसान न करता) व्यक्त केला जात आहे का? असे प्रश्न विचारले व त्यांची उत्तरे होकारार्थी असतील तर आपला राग प्रेषितीय स्वरूपाचा आहे असे मानावे.

**आत्मपरीक्षण :** मला येणारा राग वैयक्तिक स्वरूपाचा आहे की प्रेषितीय स्वरूपाचा आहे? ●●●

| सप्टेंबर २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | चौथा सप्ताह |
|---|---|---|
| सोम १८ | क्युपर्टिनीचे सं जोसेफ (पां) | : १ तिमथी.२:१–८/लूक ७:१–१० |
| मंगळ १९ | सं जानुआरीस (तां) | : तिमथी.३:१–१३/लूक ७:११–१७ |
| बुध २० | सं ॲण्ड्र्यू कीम, पॉल काँग आणि सहकारी (हि) | : तिमथी ३:१४–१६/लूक ७:३१–३५ |
| गुरू २१ | सं मत्तय (प्रेषित व शुभवर्तमानकार) (हि) | : इफिस.४:१–७,११–१३/मत्तय ९:९–१३ |
| शुक्र २२ | सं थॉमस विलानोव्हा (हि) | : तिमथी ६:२–१२/लूक ८:१–३ |
| शनि २३ | सं लायनस (हि) | : तिमथी ६:१३–१६/लूक ८:४–१५ |